# मे दिवसाचा इतिहास



अलेक्झांडर ट्रॅक्टनबर्ग

# मे दिवसाचा इतिहास

अलेक्झांडर ट्रॅक्टनबर्ग

अनुवाद
अभिजित

**ऐरण प्रकाशन**
मुंबई

**मे दिवसाचा इतिहास**
'The History of May Day' या पत्रकाचा अनुवादः 1947 साली 'इंटरनॅशनल पब्लिशर्स' द्वारे अमेरिकेत प्रकाशित आवृत्तीवरून

**प्रथम आवृत्ती:** मे 2018

**प्रकाशक:** ऐरण प्रकाशन, रूम 204, हिरानंदानी बिल्डींग, लल्लूभाई कंपाऊंड, मानखुर्द (प), मुंबई -400043. फोन नं. – 9619039793, 9145332849

**प्रमुख वितरक:** जनचेतना (www.janchetnabooks.org)

**मुखपृष्ठ:** त्रिशूल

**टाईपसेटिंग:** कंप्युटर प्रभाग, ऐरण प्रकाशन

**मुद्रणस्थळ:** आर. एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे -411030

**सहयोग मूल्य:** रु. 15/-

**मे दिवसाचा** जन्म कामाचे तास कमी करण्याच्या आंदोलनाशी अतूटपणे जोडलेला आहे—एक अशी मागणी जिचे कष्टकऱ्यांसाठी प्रचंड राजकीय महत्व आहे. अमेरिकेत फॅक्टरी व्यवस्था चालू झाली, जवळपास तेव्हापासूनच या संघर्षाचा उदय झाला.

अमेरिकेत सुरूवातीच्या काळातील संपांसाठी जास्त वेतनाची मागणी सर्वात प्रभावी कारण होते असे दिसते, पण जेव्हाही कामगारांनी अधिकारी आणि शासनाविरुद्ध आपल्या मागण्या सूत्रबद्ध केल्या तेव्हा कामाचे तास कमी करण्याचा प्रश्न आणि संघटीत होण्याचा प्रश्न केंद्रस्थानी ठेवला. जसजसे शोषण वाढत गेले आणि कामगारांना अमानवीय पद्धतीने खूप काळ काम करणे अजूनच मोठा बोजा वाटू लागले, तसतसे कामाच्या तासांमध्ये आवश्यक कपातीची मागणी कामगारांमध्ये जोर धरत गेली.

एकोणीसाव्या शतकाच्या सुरूवातीलाच कामगारांनी "सुर्योदयापासून सुर्यास्तापर्यंत" काम करण्याच्या विरोधात आपल्या तक्रारी नोंदवणे सुरू केले होते. "सुर्योदयापासून सुर्यास्तापर्यंत" हेच त्या काळात कामाचे तास होते. चौदा, सोळा आणि अगदी अठरा तास सुद्धा काम करणे अपवादात्मक नव्हते. 1806 साली अमेरिकेतील फिलाडेल्फियाच्या सरकारने संप करणाऱ्या चर्मकारांच्या नेत्यांवर षडयंत्राचे खटले चालवले. या खटल्यांमध्ये ही गोष्ट समोर आली की कामगारांकडून एकोणीस ते वीस तास काम करवून घेतले जात होते.

एकोणीसाव्या शतकाचे दुसरे आणि तिसरे दशक कामाचे तास कमी करण्यासाठीच्या संपांनी दणाणून सोडले. अनेक औद्योगिक केंद्रांमध्ये कामाचे तास दहा तासावर आणण्याची निश्चित मागणी करण्यात आली. 1827 साली फिलाडेल्फियामध्ये कामाचे तास दहावर आणण्यासाठी बांधकाम उद्योगातील कामगारांचा संप घडवण्याचे श्रेय जगातील पहिली ट्रेड युनियन मानल्या गेलेल्या 'मेकॅनिक्स युनियन ऑफ फिलाडेल्फिया'ला जाते. इंग्लंडमधील युनियनच्या दोन वर्षे अगोदरच ही युनियन बनली होती. 1834 साली न्यूयॉर्क मध्ये पावरोटी (बेकरी) कामगारांच्या संपादरम्यान 'वर्किंग मेन्स ॲडव्होकेट' नावाच्या एका वर्तमानपत्राने छापले होते की—"पावरोटी उद्योगात काम करणारे कारागीर अनेक वर्षांपासून इजिप्तच्या गुलामांपेक्षा जास्त यातना सहन करत आहेत. त्यांना दर चोवीस तासांपैकी सरासरी अठरा ते वीस तास काम करावे लागते."

या भागांमध्ये दहा तासांच्या कार्यदिवसाच्या मागणीने लवकरच एका आंदोलनाचे रूप घेतले. या आंदोलनात 1837 च्या संकटाने अडथळा आणला, पण तरीही हे आंदोलन दिवसेंदिवस विकसित होत गेले आणि यामुळेच वॉन ब्युरेन यांच्या केंद्रीय सरकारने सर्व सरकारी कर्मचाऱ्यांसाठी कामाचे तास दहा करण्याची घोषणा केली. पुढील काही दशकांमध्ये सार्वत्रिकरित्या कामाचे तास दहा करण्यासाठी संघर्ष

चालूच राहिला. अनेक उद्योगांनी ही मागणी मान्य करताच कामगारांनी कामाचे तास आठ करण्याची मागणी उचलणे सुरु केले. पन्नासच्या दशकात कामगार युनियन संघटीत करण्याच्या वेगवान प्रक्रियांनी या नवीन मागणीला मोठे बळ दिले, परंतु 1857 च्या संकटाने यात अडथळे आले. ही मागणी काही सुसंघटीत उद्योगांमध्ये हे संकट येण्याच्या अगोदरच मान्य केली गेली होती. हे आंदोलन फक्त अमेरिकेपुरतेच मर्यादीत नव्हते, उलट त्या प्रत्येक जागी प्रचलित होत होते, जिथे विकसित होत असलेल्या भांडवली व्यवस्थेमध्ये कामगारांचे शोषण होत होते. ही गोष्ट यातून समोर येते की अमेरिकेपासून दूरवर असलेल्या ऑस्ट्रेलियातील बांधकाम कामगारांनी नारा दिला होता—"आठ तास काम, आठ तास मनोरंजन, आठ तास आराम" आणि त्यांची ही मागणी 1856 साली मान्य करण्यात आली होती.

## 'कामाचे तास आठ करा' आंदोलनाची अमेरिकेत सुरूवात

ज्या संघर्षातून 'मे दिवस' जन्माला आला, तो संघर्ष अमेरिकेत 1884 मध्ये 'कामाचे तास आठ करा' आंदोलनापासून सुरू झाला. परंतु जवळपास एक पिढी अगोदर 'नॅशनल लेबर युनियन' या राष्ट्रीय श्रम संघटनेने अमेरिकन कामगार वर्गाचे झुंझार संघटनात्मक केंद्र म्हणून विकसित होण्याची आशा जागवली होती, छोट्या कार्य दिवसाचा प्रश्न उचलला होता आणि यावर एक आंदोलन उभे करण्याचे ठरवले होते. गृहयुद्धाच्या पहिल्या वर्षात (1861–62) काही राष्ट्रीय ट्रेड युनियन्सचा लोप होताना दिसून आला. या युनियन्स युद्ध सुरू होण्याअगोदर बनल्या होत्या. यांच्यामध्ये 'मोल्डर्स युनियन', 'मॅकेनिस्टस आणि ब्लॅकस्मिथ्स युनियन' या प्रमुख होत्या. पण युद्धानंतर काही वर्षांमध्ये अनेक स्थानिक श्रमिक संघटनांचे राष्ट्रीय स्तरावर एकत्रीकरण सुद्धा झाले. या युनियन्सची एक राष्ट्रीय फेडरेशन असण्याची गरज स्पष्ट दिसत होती. 20 ऑगस्ट 1866 रोजी तीन ट्रेड युनियन्सचे प्रतिनिधी बाल्टीमोर येथे भेटले आणि त्यांनी 'नॅशनल लेबर युनियन' बनवली. राष्ट्रीय संघटनेच्या निर्मितीसाठी जी चळवळ चालली त्याचे नेतृत्व विल्यम एच. सिल्विस यांनी केले होते. ते पुनर्गठीत 'मोल्डर्स युनियन' चे नेते होते. सिल्विस तरूण असले तरी श्रमिक आंदोलनांमध्ये त्यांची एक उल्लेखनीय भुमिका होती. सिल्विस लंडनमधील कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या नेत्यांशीही संपर्कात होते. त्यांनी 'नॅशनल लेबर युनियन'ला इंटरनॅशनलच्या जनरल कौन्सिलशी संबंध स्थापित करण्यासाठी प्रेरित केले.

1866 मध्ये 'नॅशनल लेबर युनियन'च्या स्थापना समारंभात लहान कार्यदिवसा संदर्भात हा ठराव पास करण्यात आला:

> "या देशातील श्रमिकांना भांडवली गुलामीतून मुक्त करण्यासाठी, वर्तमान काळाची पहिली आणि सर्वात मोठी गरज ही आहे की

> अमेरिकेतील सर्व राज्यांमध्ये आठ दिवसांच्या कार्यदिवसाला सामान्य कार्यदिवस बनवण्याचा कायदा पास करण्यात यावा. जोपर्यंत हे लक्ष्य पूर्ण होत नाही, तोपर्यंत आम्ही आमच्या पूर्ण शक्तिनीशी संघर्ष करण्याचा निर्धार करत आहोत."

या समारंभात कार्यदिवसाला आठ तास करण्याच्या कायद्याच्या मागणीसाठी स्वतंत्ररित्या राजकीय हालचाली करण्याचा ठरावही बहुमताने पास झाला. सोबतच असेही ठरले की "औद्योगिक वर्गांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी आणि नेतृत्व करण्यासाठी प्रतिज्ञाबद्ध अशा व्यक्तींची निवड करण्यात येईल".

'आठ–तास फळी'चे (आठ तासाच्या कार्यदिवसाच्या मागणीसाठी बनलेले कामगार संघटन) निर्माण हे 'नॅशनल लेबर युनियन' द्वारे केलेल्या आंदोलनाचाच परिणाम होते आणि 'नॅशनल लेबर युनियन'च्या कारवायांच्या परिणामी अनेक राज्य सरकारांनी आठ तासांचा कार्यदिवस सार्वजनिक कामांमध्ये स्विकारला. अमेरिकी कॉंग्रेसने असाच कायदा 1868 साली पास केला. या 'कामाचे तास आठ करा' आंदोलनाचे प्रेरित नेते होते बॉस्टन मधील मेकॅनिस्ट इरा स्टीवर्ड.

सुरूवातीच्या काळातील कामगार चळवळीचा कार्यक्रम आणि धोरणे, अगदी प्रारंभिक असल्या आणि नेहमीच ठोस नसल्या, तरी स्वस्थ कामगारवर्गीय चेतनेवर आधारित होत्या आणि देशातील एका खऱ्या क्रांतिकारक कामगार चळवळीचा आधार बनू शकल्या असत्या—अर्थात नंतरच्या काळात झाल्याप्रमाणे, सुधारवादी अयोग्य नेतृत्वाने आणि भांडवली राजकारण्यांनी कामगार संघटनांमध्ये शिरकाव करून जर त्यांना अयोग्य दिशेने भरकटवले नसते तर. अशाप्रकारे 65 वर्षांपूर्वी, अमेरिकन कामगारांची राष्ट्रीय संघटना असलेल्या एन. एल.यू. ने "भांडवली गुलामी" विरोधात आणि स्वतंत्रपणे राजकीय कारवायांची घोषणा केली.

सिल्विस यांनी लंडनमधील इंटरनॅशनल सोबत संपर्क कायम ठेवला. सिल्विस 'नॅशनल लेबर युनियन'चे अध्यक्ष असल्यामुळे त्यांच्या प्रभावात नॅशनल लेबर युनियनने 1867 साली आपल्या संमेलनात आंतरराष्ट्रीय कामगार वर्गाच्या आंदोलनाशी सहकार्य करण्याचा प्रस्ताव स्विकारला आणि 1869 मध्ये इंटरनॅशनलच्या जनरल कौन्सिलचे निमंत्रण स्विकारले व इंटरनॅशनलच्या बाझल कॉंग्रेसमध्ये आपला एक प्रतिनिधी सुद्धा पाठवला. दुर्दैवाने एन. एल. यू.च्या संमेलनाअगोदरच सिल्विस यांचा मृत्यू झाला आणि शिकागो मधून छापल्या जाणाऱ्या 'वर्किंग मेन्स ॲडव्होकेट' चे संपादक ए. सी. कॅमेरॉन यांना सिल्विस यांच्या जागी प्रतिनिधी म्हणून पाठवले गेले. जनरल कौन्सिलने एका विशेष प्रस्तावाद्वारे आपल्या या आशादायी तरूण अमेरिकी श्रमिक नेत्याच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला: "सर्वांच्या नजरा सिल्विस वर खिळल्या होत्या. सिल्विसकडे त्याच्या महान क्षमतांशिवाय सर्वहारा सेनेच्या जनरलच्या रूपात दहा वर्षांचा

अनुभव सुद्धा होता—आणि आता सिल्विस आपल्यात राहिलेले नाहीत". सिल्विस यांचा मृत्यू 'नॅशनल लेबर युनियन'च्या ऱ्हासाचे एक मोठे कारण ठरला. हा ऱ्हास लवकरच नॅशनल लेबर युनियनच्या अंताच्या रूपात समोर आला.

## 'कामाचे तास आठ करा' आंदोलनाबद्दल मार्क्सचे विचार

आठ तासांच्या कार्यदिवसाच्या मागणीचा निर्णय 'नॅशनल लेबर युनियन'ने ऑगस्ट 1866 मध्ये घेतला. त्याच वर्षी सप्टेंबर मध्ये पहिल्या इंटरनॅशनलच्या जिन्हिवा कॉंग्रेस मध्ये आठ दिवसांच्या कार्यदिवसाची मागणी खालील प्रकारे नमूद केली गेली:

> "कामाच्या दिवसाची वैध सीमा ठरवणे ही एक प्राथमिक अट आहे, जिच्याशिवाय कामगार वर्गाच्या स्थितीमध्ये सुधारणा किंवा मुक्तीचा कोणताही प्रयत्न सफल होऊ शकत नाही.... ही कॉंग्रेस आठ तासांच्या कार्यदिवसाच्या वैध मर्यादेचा प्रस्ताव ठेवत आहे".

1867 साली प्रकाशित 'भांडवल' ग्रंथाच्या पहिल्या खंडात "कार्यदिवसा"वर आधारित अध्यायात मार्क्सने 'नॅशनल लेबर युनियन'द्वारे चालू केलेल्या 'कामाचे तास आठ करा' आंदोलनाकडे लक्ष वेधले आहे. 'भांडवल'चा हा हिस्सा बराच प्रसिद्ध आहे कारण यात मार्क्सने काळ्या आणि गोऱ्या कामगारांच्या वर्ग हिताच्या एकतेबद्दल मांडले आहे. मार्क्स लिहितो:

> "जोपर्यंत दास प्रथा गणराज्याच्या एका भागावर कलंकासारखी चिटकून राहिली, तो पर्यंत अमेरिकेतील कोणतेही स्वतंत्र कामगार आंदोलन पंगू बनून राहीले. काळया चामडीच्या कामगारांना वेगळे म्हणून पाहिले जात आहे तोपर्यंत गोऱ्या चामडीचा कोणताही कामगार स्वत:ला मुक्त करू शकत नाही. पण दास प्रथेच्या अंतासोबतच एका नवीन ओजस्वी जीवनाचे अंकुर फुटले आहेत. गृह युद्धाचे पहिले फळ होते 'कामाचे तास आठ करा' या आंदोलनाची सुरूवात—एक असे आंदोलन जे अत्यंत वेगाने अटलांटिक पासून ते हिंद महासागरापर्यंत, न्यू इंग्लंड पासून कॅलिफोर्निया पर्यंत पसरले."

मार्क्सने या गोष्टीकडे लक्ष वेधले की कशाप्रकारे बाल्टीमोर येथील एका कामगार संमेलनाने आठ तासांच्या कार्यदिवसाच्या प्रस्तावाला बहुमताने पास केले आणि जवळपास एकाचवेळी, फक्त दोन आठवड्यांच्या आतच इंटरनॅशनलच्या जिन्हिवा कॉंग्रेसने असाच निर्णय घेतला. "अशाप्रकारे अटलांटिकच्या दोन्ही तिरावरील कामगार आंदोलनाने, जे (आंदोलन) उत्पादनाच्या परिस्थितींचा उत्स्फूर्त विकास आहे" कामाच्या दिवसाच्या मर्यादा ठरवणाऱ्या आंदोलनाचे समर्थन केले आणि 'कामाचे तास आठ करा' मागणीच्या रूपात व्यक्त केले.

जिन्हिवा कॉंग्रेसचा निर्णय अमेरिकी 'नॅशनल लेबर युनियन'च्या निर्णयाने कसा प्रेरित होता हे ठरावाच्या या भागातून दिसून येते: "ही मर्यादा संपूर्ण अमेरिकेतील कामगारांच्या सर्वसाधारण मागणीला प्रस्तुत करते, त्यामुळे ही कॉंग्रेस या मागणीला संपूर्ण जगातील कामगारांच्या सामायिक मंचाचे रुप देत आहे."

याच मुद्यावर एका आंतरराष्ट्रीय कॉंग्रेसवर अमेरिकन कामगार आंदोलनाचा असाच आणि अधिक मोठा प्रभाव पडला, पण 23 वर्षांनी.

## अमेरिकेत मे दिवसाचा जन्म

1872 मध्ये जेव्हा पहिल्या इंटरनॅशनलचे मुख्यालय लंडनवरुन न्यूयॉर्कला स्थानांतरीत झाले, तेव्हा एका आंतरराष्ट्रीय संस्थेच्या रुपात तिचा अंत झाला, पण औपचारिक रूपात तिचे अस्तित्व 1876 पर्यंत टिकून राहिले. इंटरनॅशनल पुन्हा संघटीत झाले आणि दुसऱ्या इंटरनॅशनलच्या नावाने प्रसिद्ध झाले. दुसऱ्या इंटरनॅशनलच्या पॅरिस कॉंग्रेस (1889) मध्ये एक मे ला एका अशा दिवसाचे रूप देण्यात आले ज्या दिवशी जगभरातील कामगार आपापल्या राजकीय पक्षांच्या आणि ट्रेड युनियन्सच्या माध्यमातून संघटीत होऊन आपल्या सर्वात महत्वाच्या राजकीय मागणीसाठी—आठ दिवसांचा कार्यदिवस—संघर्ष करतील. पॅरिस कॉंग्रेसचा हा महत्वपूर्ण निर्णय शिकागो मध्ये पाच वर्षांपूर्वी घेतलेल्या एका निर्णयाने प्रभावित होता. हा निर्णय पाच वर्षांपूर्वी शिकागोमध्ये एका नवनिर्मित अमेरिकन कामगार संघटनेच्या प्रतिनिधींनी घेतला होता. ही संघटना म्हणजे 'द फेडरेशन ऑफ ऑर्गनाईझ्ड ट्रेड्स अँन्ड लेबर युनियन्स ऑफ द युनायटेड स्टेट्स अँड कॅनडा', जी नंतर तिच्या संक्षिप्त नावाने म्हणजे 'द अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर' (अ.फे.ले.) या नावाने प्रसिद्ध झाली. 7 ऑक्टोबर 1884 रोजी या संघटनेच्या चौथ्या संमेलनात खालील प्रस्ताव पास झाला:

> "फेडरेशन ऑफ ऑर्गनाईझ्ड ट्रेड्स अँन्ड लेबर युनियन्स ऑफ द युनायटेड स्टेट्स अँड कॅनडा" असे ठरवत आहे की, 1 मे, 1886 पासून आठ तासांचा कार्यदिवस वैध कार्यदिवस असेल आणि आम्ही कामगार संघटनांना आग्रह करतो की त्यांनी, आपापल्या अधिकारक्षेत्रानुसार, या प्रस्तावाला अनुकूल असे आपले नियम निर्धारित करावेत."

जरी या प्रस्तावात असे कुठेही सांगितले नव्हते की ही संघटना 1 मे ला कशाप्रकारे 'आठ तास दिवसाच्या' रूपात प्रचलित करेल, तरी हे स्वयंसिद्धच आहे की 50,000 पेक्षा जास्त सदस्यांचे समर्थन नसलेली संघटना, तिचे सदस्य जिथे काम करत आहेत, त्या दुकानांमध्ये, मिल्समध्ये आणि खाणींमध्ये लढा न देता आणि अजून मोठ्या संख्येने कामगारांना या लढ्यात न आणता "आठ तासांचे काम कायदेशीर दिवसाचे काम मानले जाईल" असे घोषित करू शकत नव्हती.

"या प्रस्तावाला अनुकूल असे आपले नियम निर्धारित करतील" या तरतुदीचा रोख असा होता की एक मे 1886 रोजी संपावर जाणाऱ्या कामगारांना युनियन संपकालीन सहाय्य देतील. शक्यता होतीच की ते इतका काळ संपावर राहतील की त्यांना युनियनच्या सहाय्याची गरज पडेल. हा संप राष्ट्रीय स्तरावर होता आणि फेडरेशनशी जोडलेल्या सर्व संघटनांना सामील करत होता, त्यामुळे सर्व युनियन्सना आपापल्या नियमांनुसार आपापल्या सदस्यांची स्विकृती घेणे भाग होते कारण या संपांमध्ये खर्चाचाही भाग सामील होता. हे लक्षात ठेवले पाहिजे की फेडरेशन म्हणजे आजच्या 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर' प्रमाणेच, एक स्वैच्छिक व संघीय आधारावर बनलेली संघटना होती आणि राष्ट्रीय संमेलनाचे निर्णय फेडरेशनशी जोडलेल्या युनियन्सवर तेव्हाच लागू होऊ शकत होते जेव्हा त्या युनियन्स निर्णयाला पाठिंबा देण्याचे ठरवत असत.

## मे दिवसाच्या संपाची तयारी

1877 मध्ये जबरदस्त संप झाले. या संपांच्या दमनासाठी मोठमोठ्या भांडवलदार कंपन्यांनी आणि सरकारांनी सैनिकी दलं पाठवली ज्यांचा रेल्वे आणि स्टील कारखान्यांमधील दशसहस्त्रावधी कामगारांनी शौर्याने प्रतिकार केला. या संघर्षांचा पूर्ण कामगार आंदोलनावर खोलवर प्रभाव पडला. हा अमेरिकेतील पहिला असा लोकलढा होता जो राष्ट्रीय स्तरावर झाला होता आणि अमेरिकी कामगार वर्गाद्वारे संचालित होता. या संघर्षांमध्ये राज्यसत्ता आणि भांडवलाच्या एकत्रित शक्तीविरुद्ध कामगार भलेही हारले असतील, पण या काळानंतर अमेरिकी कामगार समाज आपल्या वर्गस्थितीची एक जास्त खोलवर समज, जास्त झुंझारपणा आणि जास्त उमेद घेऊन वर आला. एंथ्रासाईट खाणींमधील कामगार संघटना तोडण्याच्या उद्दिष्टाने दहा झुंझार खाण कामगारांना (मॉली मॅग्वायर संघटना) 1875 मध्ये फासावर चढवणाऱ्या पेनसिल्वेनियामधील कोळसा मालकांसाठी हा संघर्ष म्हणजे एक उत्तरच होते.

जरी 1880–1890 चे दशक हे अमेरिकन उद्योगांचा विकास आणि गृह बाजाराच्या विस्तारातील एक सर्वात सक्रीय दशक होते, तरी 1873 च्या संकटानंतर 1884–1885 दरम्यान एका आवर्ती मंदीला तोंड द्यावे लागले. या काळातील बेरोजगारी आणि प्रचंड हालअपेष्टांमुळे लहान कार्य दिवसाच्या आंदोलनाला बरेच बळ मिळाले.

नुकत्याच बनलेल्या 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर'ने त्यावेळी ही शक्यता पाहिली की 'आठ तासांचा कार्य दिवस' या घोषणेला अशा एका घोषणेच्या रूपात वापरले जाऊ शकते जी फेडरेशन मध्ये आणि 'नाईट्स ऑफ लेबर' (श्रमाचे योद्धे) मध्ये नसलेल्या कामगारांना एका झेंड्याखाली आणू शकते. 'नाईट्स ऑफ लेबर' कामगारांचे एक जुने संघटन होते जे निरंतर वाढत होते. फेडरेशनला

समजले होते की सर्व कामगारांना सोबत घेऊनच आठ तासांच्या कार्यदिवसाच्या आंदोलनाला सफल बनवले जाऊ शकते. याच समजूतीतून 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर'ने 'नाईट्स ऑफ लेबर'ला या आंदोलनात सहयोग देण्याचे आवाहन केले.

फेडरेशनच्या 1885 च्या संमेलनात येत्या वर्षाच्या पहिल्या मे रोजी संपावर जाण्याचा संकल्प पुनर्रेखित करण्यात आला. अनेक राष्ट्रीय युनियन्सनी, विशेषतः सुतारांच्या आणि सिगारेट बनवणाऱ्यांच्या युनियन्सनी, संपाच्या तयारीसाठी पावलं पण टाकली. एक मे रोजीच्या संपासाठी होत असलेल्या आंदोलनांनी लगेच परिणाम दाखवणे चालू केले. संपकरी युनियन्सच्या सदस्य संख्येत सतत वाढ होऊ लागली. 'नाईट्स ऑफ लेबर' संघटनेचा जोरात विकास झाला. परिणामी 1886 साली कामगारांचे हे झुंझार संघटन उत्कर्षाच्या शिखरावर होते. या काळात 'नाईट्स ऑफ लेबर'ने, जे फेडरेशन पेक्षा जास्त प्रसिद्ध होते आणि एक अतिशय झुंझार संघटन म्हणून ओळखले जात होते, आपली सदस्य संख्या वाढवत 2 लाखावरून 7 लाखांपर्यंत पोहोचवली होती. ज्यांनी आंदोलनाची सुरूवात केली आणि संपाची तारीख ठरवली, त्या फेडरेशनच्या सदस्य संख्येतही मोठी वाढ झाली आणि कामगारांच्या जनसमुदायात त्यांचा सन्मानही खुप वाढला. संपाची तारीख जसजशी जवळ येत होती तसतशी ही गोष्ट समोर येत होती की 'नाईट्स ऑफ लेबर'चे नेतृत्व, विशेषत: टेरेंस पाऊडरली यांचे नेतृत्व आंदोलनाला नुकसान पोहोचवत आहे आणि इतकेच नाही तर त्यांच्याशी जोडलेल्या युनियन्सना संपात भाग न घेण्याचा सल्ला देत आहे. यामुळेही फेडरेशन कामगारांमध्ये अजून लोकप्रिय होत होते. दोन्ही संघटनांच्या झुंझार कामगार सदस्यांच्या फळ्या सतत, उत्साहपूर्वक संपाची तयारी करत होत्या. अनेक शहरांमध्ये 'आठ तास चमू' आणि याच प्रकारचे इतर जथ्थे उभे झाले. या प्रकारच्या उभारामुळे पूर्ण आंदोलनात कामगारांमध्ये झुंझारपणाच्या भावनेत जबरदस्त वाढ झाली. या लहरीतून असंघटीत कामगारही सुटले नाहीत, तेही हिरीरीने आंदोलनात सहभाग घेऊ लागले. अमेरिकन कामगार वर्गासाठी एक नवी पहाट होत होती.

कामगारांच्या संघर्षांच्या गंभीरतेचे आणि विस्ताराचे अध्ययन करणे, समजणे हा कामगारांचा कल समजून घेण्याचा सर्वात चांगला मार्ग आहे. एखाद्या काळात झालेल्या संपांची संख्या, त्या कालखंडातील कामगारांची लढण्याची तयारी दर्शवते. अगोदरच्या वर्षांमध्ये झालेल्या संपांच्या तुलनेत 1885 ते 1886च्या दरम्यान झालेल्या संपांची संख्या त्याकाळातील कामगारांच्या त्या जबरदस्त लढाऊपणाचे दर्शन घडवते, जो त्याकाळातील आंदोलनाला गती देत होता. कामगार एक मे 1886 च्या त्या महान संपाची तयारी तर करत होतेच, पण 1885 मध्येच संपांच्या संख्येत जबरदस्त वाढ झाली होती. 1881 पासून 1884 पर्यंत सरासरी 500 संप आणि टाळेबंदी दरवर्षी होत होत्या, आणि त्यांच्यामध्ये भाग

घेणाऱ्या कामगारांची सरासरी संख्या प्रति वर्ष 1,50,000 होती. 1885 मध्ये संप आणि टाळेबंदींची संख्या 700 वर पोहोचली होती आणि भाग घेणाऱ्या कामगारांची संख्या वाढून 2,50,000 वर गेली होती. 1886 साली तर संपांची संख्या 1885 च्या तुलनेत दुप्पट होऊन 1,572 झाली आणि त्याच प्रमाणात संप व टाळेबंदींमध्ये भाग घेणाऱ्या कामगारांची संख्या सुद्धा वाढून 6,00,000 झाली. या संपांच्या व्यापकतेचा अंदाज यावरून लावला जाऊ शकतो की 1885 मध्ये या संपांनी बाधित प्रतिष्ठानांची संख्या 2,467 होती आणि पुढच्या वर्षी ही संख्या वाढून 11,562 वर जाऊन पोहोचली. 'नाईट्स ऑफ लेबर'च्या नेतृत्वाच्या खुल्या दगाबाजी नंतरही असा अंदाज आहे की जवळपास 5 लाख कामगार 'कामाचे तास आठ करा' आंदोलनात सरळ सहभागी होते.

संपांचे केंद्र शिकागो होते जिथे सर्वात व्यापक संप होत होते, पण एक मे रोजी अनेक इतर शहरं सुद्धा या मोहिमेत सामील होती. न्यूयॉर्क, बाल्टीमोर, वॉशिंग्टन, मिलवाकी, सिनसिनाटी, सेंट लुई, पिट्सबर्ग, डेट्रॉईट सहीत अनेक शहरांमध्ये शानदार संप झाले. या आंदोलनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य हे होते की याने अकुशल आणि असंघटीत कामगारांनाही संपामध्ये खेचले आणि सहानुभूतीपूर्ण संप या काळात बरेच प्रचलित झाले. संपूर्ण देशात एक विद्रोही भावना पसरली होती, भांडवली इतिहासकार या संपांदरम्यान दिसून येणाऱ्या "सामाजिक युद्ध" आणि "भांडवलाशी घृणेबद्दल" तसेच चळवळीत सर्वत्र पसरलेल्या कार्यकर्त्यांच्या उत्साहाबद्दल बोलत होते. असे म्हणू शकतो की एक मे रोजी संप करणाऱ्या कामगारांपैकी जवळपास निम्म्यांना यश मिळाले आणि जिथे ते आठ दिवसांच्या कार्यदिवसाची मागणी पूर्ण करवू शकले नाहीत तिथेही कामाचे तास बरेच कमी करण्यात सफल झाले.

## शिकागो मधील संप आणि 'हेमार्केट' मधील घटना

एक मे रोजी संपाचे सर्वात आक्रमक रूप शिकागो मध्ये होते जे त्यावेळी झुंझार डाव्या कामगार आंदोलनाचे केंद्र होते. कामगारांच्या समस्येवर या आंदोलनाचा राजकीय दृष्टीकोण सुस्पष्ट नव्हता, पण तरीही हे एक झुंझार आणि लढाऊ आंदोलन होते जे कामगारांना कृतीचे आवाहन करण्यासाठी, आणि कामगारांच्या जीवनाच्या व काम करण्याच्या स्थितीत तात्कालिक सुधार आणण्यासाठीच्या संघर्षात झुंझारपणाची भावना विकसित करण्यासाठी, कायम तयार होते.

आक्रमक कामगार गटांच्या मदतीने शिकागोच्या संपाने भव्य रूप घेतले. 'आठ तास असोसिएशन' नावाने बरेच अगोदरच संपाच्या तयारीसाठी एक संघटना बनली होती. डाव्या कामगार संघटनांनी बनलेल्या 'सेंट्रल लेबर युनियन' ने 'आठ तास असोसिएशन'ला पूर्ण सहकार्य केले. ही असोसिएशन एक संयुक्त मोर्चा होती जिच्यात फेडरेशन पासून 'नाईट्स ऑफ लेबर' आणि 'सोशलिस्ट लेबर पार्टी'

सुद्धा सामील होते. 'सोशलिस्ट लेबर पार्टी' ही अमेरिकन कामगार वर्गाची पहिली संघटीत समाजवादी राजकीय पार्टी होती. एक मे च्या अगोदरच्या रविवारी 'सेंट्रल लेबर युनियन'ने शक्तीप्रदर्शनाचे एक आंदोलन केले ज्यात 25,000 कामगारांनी भाग घेतला.

एक मे रोजी शिकागो मध्ये कामगारांचा एक भव्य मोर्चा निघाला आणि संघटीत कामगार आंदोलनाच्या आवाहनावर कामगारांनी शहरातील सगळी अवजारं बंद ठेवली. कामगार आंदोलनाने अनुभवलेले आजपर्यंतचे वर्ग–एकतेचे हे सर्वात शानदार आणि प्रभावी प्रदर्शन होते. त्यावेळी आठ तासांच्या कार्य–दिवसाच्या मागणीच्या महत्वाने आणि संपाच्या चरित्र व विस्ताराने पूर्ण आंदोलनाला एक विशेष राजकीय अर्थ प्राप्त करून दिला. पुढील काही दिवसांमध्ये हा राजकीय अर्थ अजून गहन होत गेला. आठ तासाची चळवळ, जीची परिणती एक मे 1886 रोजी संपात झाली, अमेरिकन कामगार वर्गाच्या लढ्याच्या इतिहासातील एक गौरवास्पद अध्याय आहे.

कामगारांचे शत्रू गप्प बसले नाहीत. आंदोलनाच्या झुंझार नेत्यांना संपवण्यासाठी आणि त्याद्वारे शिकागोच्या समस्त कामगार आंदोलनाला चिरडून टाकण्यासाठी, शिकागो मधील कामगारांच्या विजयी मोर्चाला खीळ घातली ती मालक आणि भांडवलदार वर्गाच्या एकत्रित वरचढ शक्तीने. 3 आणि 4 मे रोजीच्या घटना, ज्यांना 'हेमार्केट प्रकरण' म्हणून ओळखले जाते, स्पष्टपणे 1 मे च्या संपाचाच परिणाम होत्या. 3 मे रोजी 'मॅककार्मिक रिपर वर्क्स' येथील कामगारांच्या एका सभेवर पोलिसांनी केलेल्या निर्घृण हल्ल्यात सहा कामगार मारले गेले होते आणि अनेक जखमी झाले होते. याचा निषेध करण्यासाठी 4 मे रोजी 'हेमार्केट' चौकात निदर्शन करण्यात आले. 'हेमार्केट' चौकातील सभा शांततापूर्ण पद्धतीने पार पडली आणि संपतच होती की पोलिसांनी जमलेल्या कामगारांच्या गर्दीवर हल्ला चढवला. यामध्ये अचानक गर्दीवर एक बॉब फेकण्यात आला ज्यात एका सार्जंटचा मृत्यू झाला. यानंतर रण माजले व चार कामगार आणि सात पोलिस मारले गेले. 'हेमार्केट' मधील भयंकर रक्तपात, (त्यानंतर) कामगार नेते पार्सन्स, स्पाईस, फिशर, आणि एन्गेल यांना विधिनिषेधशून्य पद्धतीने फासावर चढवणे आणि शिकागोमधील इतर झुंझार नेत्यांना कैद—हे संघर्ष करत असलेल्या कामगारांना शिकागोंमधील मालकांचे उत्तर होते. संपूर्ण देशातील मिल्स आणि फॅक्टऱ्यांच्या मालकांसाठी ही कृतीची सुचना होती. 1885–86च्या आंदोलनामध्ये गमावलेल्या आपल्या स्थितीला परत मिळवण्यासाठी 1886च्या उत्तरार्धात मालकांनी बराच आक्रामक पवित्रा अवलंबला.

शिकागो मधील कामगार नेत्यांच्या फाशीच्या एका वर्षानंतर फेडरेशनच्या (जे आता 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर' या नावाने प्रसिद्ध झाले होते) सेंट लुई

येथील संमेलनामध्ये, 1888 मध्ये, 'कामाचे तास आठ करा' आंदोलनाला पुन्हा नव्याने जिवंत करण्याचा संकल्प घेण्यात आला. एक मे, जो आता एक परंपरा बनला होता आणि दोन वर्षांअगोदर कामगारांच्या राजकीय वर्ग–प्रश्नाच्या आधारावर झालेल्या संघर्षाचा केंद्र बिंदू बनला होता, 'कामाचे तास आठ करा' आंदोलनाच्या सुरूवातीचा दिवस ठरवण्यात आला. एक मे 1890 रोजी पूर्ण देशात छोट्या कार्यदिवसासाठी संप होणार होते. 1889 च्या संमेलनात 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर'चे नेते सॅम्युअल गॉपर्स यांच्या नेतृत्वाखाली संप मर्यादित करण्याचा प्रयत्न सफल झाला. असे ठरले की संपासाठी सर्वात चांगली मानली जाणारी युनियन म्हणझे 'कारपेंटर्स युनियन' (सुतारांची युनियन) संपात पुढाकार घेईल आणि जर ती सफल झाली तर दुसऱ्या युनियन सुद्धा संपात उडी मारतील.

## मे दिवस आंतरराष्ट्रीय बनला

गॉपर्सने आपल्या आत्मचरित्रात मे दिवसाला आंतरराष्ट्रीय कामगार सुट्टीचा दिवस बनवण्यात 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर'चे योगदान अशाप्रकारे सांगितले आहे: "जसजसे 'कामाचे तास आठ करा' आंदोलनाची योजना विकसित होत होती, तसतसे आम्ही सतत विचार करत होतो की आपले लक्ष्य कसे विस्तारित करावे. जसजसे पॅरिस मध्ये होणाऱ्या कामगारांच्या आंतरराष्ट्रीय कॉंग्रेसची (इंटरनॅशनल वर्किंगमेन्स कॉंग्रेस) वेळ जवळ येत होती, मला हे लक्षात येत होते की या कॉंग्रेसमध्ये विश्वव्यापी सहानुभूती मिळवून आम्ही आंदोलनाला लाभ पोहोचवू शकतो." गॉपर्सने खूप अगोदरच आपली सुधारवादी आणि संधीसाधूपणाची लक्षणे दाखवली होती. त्याचा हाच कल पुढे जाऊन वर्ग–सहयोगवादी धोरणांमध्ये पूर्णत: परिवर्तित झाला. हाच गॉपर्स आता समाजवादी कामगारांच्या त्या आंदोलनाचे समर्थन घेण्यास तयार होता, ज्याच्या प्रभावाला त्याने जबरदस्त विरोध केला होता.

14 जुलै, 1889 रोजी बास्तीलच्या पतनाच्या सोळाव्या स्मृतीदिनी पॅरिसमध्ये अनेक देशांमधील संघटीत समाजवादी आंदोलनांचे नेते एकत्र झाले. ते पॅरिसमध्ये त्या आंतरराष्ट्रीय संघटनेसारखी (पहिली इंटरनॅशनल) कामगारांची एक आंतरराष्ट्रीय संघटना बनवण्यासाठी पुन्हा एकत्र आले होते जिला 25 वर्षांपूर्वी त्यांचे महान शिक्षक–कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स यांनी बनवले होते. 'दुसऱ्या इंटरनॅशनल'च्या या स्थापना बैठकीत एकत्र आलेल्या प्रतिनिधींनी अमेरिकन प्रतिनिधींकडून 1884–86 दरम्यान अमेरिकेत चाललेल्या 8 तासांच्या कार्यदिवसाच्या आंदोलनाबद्दल आणि नजिकच्या काळात आंदोलनाने पुन्हा नव्याने उभारी घेतल्याचे ऐकले. अमेरिकन कामगारांच्या उदाहरणाने उत्साहित होऊन पॅरिस कॉंग्रेसने खालील प्रस्ताव स्विकार केला:

> "काँग्रेस एक विशाल आंतरराष्ट्रीय निदर्शन आयोजित करण्याचा निर्णय घेत आहे, जेणेकरून एका विशिष्ट दिवशी, सर्व देशांमध्ये आणि सर्व शहरांमध्ये कष्टकरी जनसमुदाय राज्यसतेच्या अधिकाऱ्यांकडे कायदेशीरपणे आठ तासांचा दिवस करण्याची आणि पॅरिस काँग्रेसच्या इतर निर्णयांना लागू करण्याची मागणी करू शकेल. 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर' ने डिसेंबर 1888 मध्ये त्यांच्या सेंट लुई संमेलनात अशा आंदोलनासाठी अगोदरच एक मे 1890चा दिवस ठरवलेला आहे, त्यामुळे या दिवसाला आंतरराष्ट्रीय निदर्शनांसाठी स्विकारले जात आहे. विविध देशांमधील कामगारांनी आपापल्या देशांमध्ये असलेल्या परिस्थितीनुसार या निदर्शनांचे आयोजन केले पाहिजे."

1890 चा मे दिवस अनेक युरोपीय देशांमध्ये साजरा झाला. अमेरिकेत समाजवादी पीटर मॅग्वायर यांच्या नेतृत्वाखाली 'कारपेंटर्स युनियन'ने (सुतारांची युनियन) आणि निर्माण कार्यातील कामगारांच्या इतर युनियन्सनी आठ तासांच्या कार्य-दिवसाच्या मागणीला घेऊन संप आयोजित केला. समाजवाद्यांच्या विरोधात असाधारण कठोर नियम असूनही कामगारांनी पोलिसांशी त्वेषाने संघर्ष करत जर्मनीच्या औद्योगिक शहरांमध्ये मे दिवस साजरा केला. याचप्रमाणे अधिकाऱ्यांनी इशारा दिला असूनही आणि पोलिसांनी कामगारांचे दमन करण्याचा प्रयत्न करूनही इतर युरोपियन राजधान्यांमध्ये याच प्रकारचे आंदोलन झाले. अमेरिकेतील शिकागो आणि न्यूयॉर्क शहरांमध्ये झालेल्या निदर्शनांचे विशेष महत्व होते. अनेक हजार लोकांनी आठ तासांच्या कार्य-दिवसाच्या मागणीला घेऊन रस्त्यांवर मोर्चे काढले आणि मोर्चे शहरांमधील मुख्य केंद्रांवर जाहीर सभा घेऊन संपले.

1891 च्या ब्रुसेल्स येथे आयोजित कॉग्रेस मध्ये इंटरनॅशनलने मे दिवसाचे मूळ लक्ष्य म्हणजे 'कामाचे तास आठ करा' तर पुनर्रेखित केलेच, पण सोबतच हे सुद्धा जोडले की या दिवशी कामाच्या परिस्थितीत अनिवार्य रूपाने बदल करण्यासाठी आणि विविध राष्ट्रांमध्ये शांती स्थापन व्हावी म्हणूनही निदर्शने झाली पाहिजेत. या सुधारित प्रस्तावात आठ तासांच्या कार्य दिवसासाठी "मे दिवसाच्या आंदोलनांचे वर्ग चरित्र" आणि "वर्ग संघर्षाला तीव्र करणाऱ्या" मागण्यांवर जोर देण्यात आला. प्रस्तावामध्ये अशीही मागणी करण्यात आली की "जिथेही शक्य आहे" तिथे काम थांबवले पाहिजे. मे दिवसाच्या संपाचा मुद्दा सशर्त होता, पण इंटरनॅशनलने आंदोलनाच्या उद्दिष्टांना विस्तारित करण्यासाठी आणि त्यांना ठोस रूप देण्यासाठी प्रयत्न चालू केले. ब्रिटिश कामगार संघटनेने सशर्त संप करण्याचा प्रस्ताव स्विकारण्यास सुद्धा नकार देत आपला संधीसाधूपणा दाखवला, आणि जर्मन सामाजिक जनवाद्यांसोबत मिळून मे दिवसाच्या आंदोलनाला मे च्या पहिल्या रविवार पर्यंत पुढे ढकलण्याच्या बाजूने मतदान केले.

## आंतरराष्ट्रीय मे दिवसाबद्दल एंगल्सचे विचार

एंगल्सने 1 मे, 1890 रोजी लिहिलेल्या 'कम्युनिस्ट घोषणापत्रा'च्या चौथ्या जर्मन आवृत्तीच्या प्रस्तावनेत आंतरराष्ट्रीय सर्वहारा संघटनांच्या इतिहासाची समीक्षा करत पहिल्या आंतरराष्ट्रीय़ मे दिवसाच्या महत्वाकडे लक्ष वेधले:

> "जेव्हा मी या ओळी लिहीत आहे, तेव्हा युरोप आणि अमेरिकेतील सर्वहारा आपल्या शक्तींची समीक्षा करत आहे. ही पहिलीच वेळ आहे जेव्हा सर्वहारा वर्ग एका झेंड्याखाली, एका तात्कालिक उद्दिष्टासाठी, एका सेनेच्या रुपात गोलबंद झाला आहे: आठ तासांच्या कार्य–दिवसाला कायद्याद्वारे स्थापित करण्यासाठी.... हे जे भव्य दृश्य आपण बघत आहोत ते सर्व जगातील भांडवलदार, भूस्वामींना एक गोष्ट चांगल्या प्रकारे नक्कीच समजावेल की सर्व जगातील कामगार खरोखर एक आहेत. आपल्या डोळ्यांनी हे पाहण्यासाठी माझ्या सोबत मार्क्स सुद्धा हवा होता!"

सर्वहारा वर्गाचे हे एकसाथ होणारे आंदोलन सर्व जगातील कामगारांच्या कल्पना आणि क्रांतिकारक सहजवृत्तींना अधिकाधिक जागृत करत होते आणि दरवर्षी आंदोलनांमध्ये भाग घेणाऱ्या कामगारांची संख्या वाढत होती.

1893 साली ज्युरीख मध्ये इंटरनॅशनलच्या कॉंग्रेसमध्ये, ज्या कॉंग्रेसमध्ये एंगल्स सुध्दा उपस्थित होते, एक मे च्या समर्थात जोडलेल्या प्रस्तावाचे खालील अंश आंदोलनाप्रती कामगारांचे वाढते समर्थन दाखवतात:

> "एक मे रोजी आठ दिवसांच्या कार्य दिवसासाठी होणाऱ्या आंदोलनासोबतच, अनिवार्यपणे, सामाजिक परिवर्तनाच्या माध्यमातून, वर्गभेद नष्ट करण्याच्या कामगार वर्गाच्या दृढनिश्चयी आकांक्षांचे प्रदर्शन सुद्धा झाले पाहिजे. अशाप्रकारे कामगार वर्गाने त्या रस्त्यावर पाऊल टाकले पाहिजे जो सर्व मनुष्यांसाठी शांती अर्थात आंतरराष्ट्रीय शांतीकडे नेणारा एकमात्र रस्ता आहे."

अनेक पक्षांच्या सुधारवादी नेत्यांनी संघर्षाच्या या दिवसाला मनोरंजन आणि आरामाचा दिवस बनवण्याचा प्रयत्न करून एक मे च्या निदर्शनांना सत्वहीन बनवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच ते नेहमी मे दिवसाचे आंदोलन एक मे च्या सर्वात जवळच्या रविवारी आयोजित करण्यावर जोर देत. रविवारी कामगारांना संपाद्वारे काम ठप्प करण्याची गरज नव्हती, कारण तसेही त्या दिवशी काम होत नव्हते. सुधारवादी नेत्यांसाठी हा दिवस फक्त कामगारांच्या एका आंतरराष्ट्रीय सुट्टीचा, शोभायात्रांचा आणि उद्यानं व दूरवर खेड्यांमध्ये मैदानी खेळांचा दिवस होता. मे दिवसाबद्दल ज्युरीख येथील कॉंग्रेसच्या प्रस्तावात ही मागणी केली गेली

होती की मे दिवस "वर्गभेद नष्ट करण्याच्या कामगार वर्गाच्या दृढनिश्चयी आकांक्षांच्या प्रदर्शनाचा दिवस" असला पाहिजे. म्हणजे एक असे आंदोलन जे शोषण आणि मजूरी गुलामीवर आधारित भांडवली व्यवस्थेच्या नाशासाठी असेल. पण सुधारवाद्यांना या मुद्यावर काहीच हरकत नव्हती कारण ते स्वत:ला इंटरनॅशनलच्या निर्णयांनी बांधलेले मानतच नव्हते. ते इंटरनॅशनलच्या कॉंग्रेसला फक्त आंतरराष्ट्रीय दोस्ती आणि सद्भावासाठी केले जाणारे एक संमेलन मानत होते. अशी संमेलनं पहिल्या महायुद्धाच्या अगोदर अनेक युरोपीय राजधान्यांमध्ये होत असत. त्यांनी सर्वहारा वर्गाच्या आंतरराष्ट्रीय एकजूट कारवायांना निराश आणि परास्त करण्याचे सर्व प्रयत्न केले. आंतरराष्ट्रीय कॉंग्रेसचे निर्णय जे त्यांच्या विचारांशी जुळत नव्हते, ते फक्त कागदी प्रस्ताव बनले. वीस वर्षांनंतर या सुधारवाद्यांचा 'समाजवाद' आणि 'आंतरराष्ट्रीयतावाद' सर्व जगासमोर एकदम उघडा आणि नागडा झालेला होता. 1914 मध्ये इंटरनॅशनल विखुरले गेले कारण आपल्या जन्मापासूनच ते आपल्या मृत्यूला सोबत घेऊन चालत होते आणि ते कारण होते—कामगार वर्गाला भरकटवणारे सुधारवादी नेते.

1900 साली पॅरिसच्या आंतरराष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये जुन्या कॉंग्रेसमध्ये ठरवलेल्या मे दिवसाच्या प्रस्तावाचा पुनरुच्चार करण्यात आला आणि मे दिनी काम बंद केल्यास तो अधिक प्रभावी होईल या पुस्तीने त्याला अजूनच मजबूत केले. दिवसेंदिवस मे दिवसाचे आंदोलन आता शक्ती प्रदर्शनात बदलत होते. आंदोलनात भाग घेणाऱ्या आणि एक मे रोजी काम बंद करणाऱ्या कामगारांची संख्या सतत वाढत होती. मे दिवस 'लाल दिवस' बनला, एक असा दिवस जो जेव्हा पण यायचा तेव्हा शासकांसाठी अपशकूनाची भावना घेऊनच यायचा.

## मे दिवसाबद्दल लेनिनचे विचार

रशियन क्रांतिकारक आंदोलनात आपल्या सुरूवातीच्या सक्रियतेच्या काळातच, रशियन कामगारांना मे दिवसाचा परिचय करून देण्यात आणि हे सांगण्यात की हा दिवस आंदोलन आणि संघर्षांचा दिवस आहे, लेनिनने विशेष योगदान दिले. 1896 मध्ये जेव्हा लेनिन जेल मध्ये होते, त्यांनी 'कामगार वर्गाच्या मुक्तीसाठी संघर्ष करणारी सेंट पीटर्सबर्ग युनियन' या कामगार संघटनेसाठी मे दिवसाचे एक पत्रक लिहिले होते. ही कामगार संघटना रशियात बनलेल्या सर्वात पहिल्या मार्क्सवादी राजकीय गटांपैकी एक होती. हा दस्तावेज, बेकायदेशीर पद्धतीने जेलच्या बाहेर आणला गेला, मीमोग्राफी तंत्राद्वारे त्याच्या 2,000 प्रती नक्कल करण्यात आल्या आणि त्यांना 40 कारखान्यांच्या कामगारांमध्ये वितरित करण्यात आले. हे पत्रक बरेच लहान होते आणि लेनिनच्या वैशिष्ट्यपूर्ण सोप्या आणि सरळ शैलीत लिहिलेले होते, जेणेकरून सर्वात कमी समजदार कामगार सुद्धा त्याला सहजतेने समजू शकेल. त्याकाळात प्रकाशनात मदत केलेल्या एका व्यक्तीने लिहिले आहे:

"जेव्हा एका महिन्यानंतर 1896 मध्ये प्रसिद्ध कापड गिरणी संप झाला, तेव्हा कामगार आम्हाला सांगत होते की या आंदोलनाला गती देणारा पहिला प्रेरणास्त्रोत म्हणजे तेच मे दिवसाचे पत्रक होते."

या पत्रकात कारखान्यांचे मालक कशा प्रकारे आपल्या नफ्यासाठी कामगारांचे शोषण करतात आणि आपल्या स्थितीला सुधारण्याची मागणी केल्यावर सरकार कामगारांवर कशाप्रकारे अत्याचार करते, हे सांगितल्यावर लेनिन कामगारांना मे दिवसाचे महत्व सांगतात.

> "फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, आणि इतर देशांमधील कामगार अगोदरच शक्तिशाली युनियन्समध्ये एकत्र झालेले आहेत आणि त्यांनी आपले अनेक अधिकार लढून जिंकले आहेत. ते 19 एप्रिल (1 मे) [पूर्वी रशियन कॅलेंडर हे युरोपियन कॅलेंडरच्या 13 दिवस मागे चालत असे] ला एकत्र येतात, जो कामगारांचा एक सुट्टीचा दिवस आहे. त्या दिवशी ते घुसमटणाऱ्या कारखान्यांना सोडून संगीताच्या लयीवर आपल्या झेंड्याला फडकावत, आपल्या मालकांना सतत आपली वाढती शक्ती दाखवत, शहरातील मुख्य रस्त्यांवर मोर्चे काढतात. त्या दिवशी मोठ्या संख्येने कामगार या निदर्शनांमध्ये भाग घेतात आणि आपल्या भाषणांमध्ये गतकाळात मालकांवर मिळवलेल्या विजयांचा पुनरुच्चार करतात आणि येणाऱ्या काळातील संघर्षांच्या योजना तयार करतात. संपाच्या भितीपुढे दबलेल्या मालकांची हिंमत होत नाही की ते कारखान्यात न येण्यासाठी कामगारांवर एका पैशाचाही दंड लावतील. त्या दिवशी कामगार पुन्हा मालकांसमोर आपली जुनी मुख्य मागणी ठेवतात: 'आठ तास काम, आठ तास आराम, आठ तास मनोरंजन'. हीच ती मागणी आहे जी इतर देशांमधील कामगार सतत बुलंद करत आहेत."

रशियन क्रांतिकारक आंदोलनाने मे दिवसाचा पूर्ण फायदा उचलला. नोव्हेंबर 1900 मध्ये 'खारकोव मध्ये मे दिवस' नावाने पुस्तकात प्रकाशित प्रस्तावनेत लेनिनने म्हटले:

> "येत्या सहा महिन्यांमध्ये, रशियन कामगार नवीन शतकाच्या पहिल्या वर्षाचा मे दिवस साजरा करतील. हीच ती वेळ आहे जेव्हा शक्य तितक्या मोठ्या संख्येने जागोजागी मे दिवस साजरा केला गेला पाहिजे. आपण यामध्ये मोठ्या संख्येने भाग घेतलाच पाहिजे; पण फक्त मोठ्या संख्येने कामगारांनी भाग घेणे पुरेसे नाही, तर पूर्णतः संघटीत होऊन, आपली वर्ग जाणीव प्रदर्शित करत, रशियातील जनतेच्या राजकीय मुक्तीसाठी अदम्य संघर्षाची सुरुवात दर्शवणाऱ्या

निर्धारासहित, सर्वहारांच्या वर्गविकासाच्या मुक्त संधीसाठी आणि समाजवादासाठीच्या खुल्या संघर्षासाठी सहभागी झाले पाहिजे."

हे सहज समजू शकतो की लेनिन मे दिवसाला किती महत्व देत होते. त्यांनी कामगारांना सहा महिने अगोदरच आवाहन केले होते की मे दिनी संघटीत होऊन तो कसा साजरा करावा. त्यांच्यासाठी मे दिवस "रशियन जनतेच्या राजकीय मुक्तीसाठी एक अदम्य संघर्ष उभा करण्याचा" आणि "सर्वहारा वर्ग–विकास आणि समाजवादासाठी मोर्चे काढण्याचा" दिवस होता.

मे दिवसाचे आयोजन कसे "महान राजकीय आंदोलन बनू शकते", यावर बोलताना 1900 साली खारकोव मध्ये मे दिवसाचे आयोजन एक "विशिष्ट महत्वाची घटना" आहे असे म्हणत तिचे कारण सांगताना लेनिनने म्हटले की "या दिवशी रस्त्यांवर मोठमोठ्या सभा झाल्या, मोठ्या संख्येने कामगारांनी संपामध्ये भाग घेतला, लाल झेंडे फडकावले, आठ तासांचा कार्यदिवस आणि राजकीय स्वतंत्रतेच्या पत्रकात छापलेल्या मागण्या आणि या मागण्यांच्या क्रांतिकारक चरित्राचे प्रदर्शन केले."

लेनिनने खारकोव मधील पार्टी नेत्यांची आठ दिवसाच्या कार्य दिवसाच्या मागणीसोबतच इतर छोट्या मोठ्या मागण्या आणि शुद्ध आर्थिक मागण्या एकत्र केल्याबद्दल कडक भर्त्सना केली, कारण त्यांची इच्छा होती की मे दिवसाचे राजकीय चरित्र कोणत्याही प्रकारे धुसर होऊ नये. याबद्दल ते त्यांच्या प्रस्तावनेत लिहितात की:

> "या मागण्यांमध्ये सर्वात पहिली मागणी होती आठ तासांच्या कार्य–दिवसाची मागणी, जी सर्व देशांमधील सर्वहारा वर्गाने केलेली आहे. खारकोव मधील कामगारांनी ही मागणी करणे म्हणजे त्यांनी कामगारांच्या आंतरराष्ट्रीय समाजवादी कामगार आंदोलनाशी एकजुटतेच्या भावनेचे प्रदर्शन आहे. पण यामुळेच या मागणीला इतर छोट्या–मोठ्या आर्थिक मागण्यांसोबत जोडले नाही पाहिजे, जसे फोरमन कडून चांगल्या व्यवहाराची अपेक्षा किंवा पगारात दहा टक्यांनी वाढ होण्याची मागणी. आठ दिवसांच्या कार्य दिवसाची मागणी संपूर्ण सर्वहारा वर्गाची मागणी आहे आणि सर्वहारा ही मागणी एका मालकाकडे नाही तर आजच्या सामाजिक–राजकीय व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सरकारकडे करत आहे. सर्वहारा ही मागणी सर्व भांडवलदार वर्गासमोर ठेवत आहे जो सर्व उत्पादनाच्या साधनांचा मालक आहे."

## मे दिवसाच्या राजकीय घोषणा

आंतरराष्ट्रीय सर्वहारासाठी मे दिवस केंद्रीय बिंदू बनला होता. आठ तासांच्या कार्य दिवसाच्या मूळ मागणीसोबत इतर दुसऱ्या महत्वपूर्ण घोषणा जोडल्या गेल्या. ज्यांच्याकडे, मे दिवसाच्या संप आणि निदर्शनांमध्ये, लक्ष्य देण्यासाठी कामगारांना आवाहन करण्यात आले. यात हे नारे सामील होते: "आंतरराष्ट्रीय कामगार–वर्गाची एकता जिंदाबाद", "साम्राज्यवादी युद्ध आणि वसाहतिक उत्पीडनाचा विरोध करा", "राजकीय कैद्यांना मुक्त करा", "सार्वत्रिक मताधिकार द्या", "आंदोलन करण्याचा अधिकार द्या", "कामगारांना राजकीय आणि आर्थिक संघटना बनवण्याचा अधिकार द्या".

मे दिवसाच्या प्रश्नावर जुन्या इंटरनॅशनलचे शेवटचे वक्तव्य 1904 मधील ॲमस्टरडॅम कॉंग्रेस मध्ये आले. मे दिवसाच्या आंदोलनांमध्ये वापरले जाणारे नारे आणि अनेक देशांमध्ये अजूनही मे दिवस एक मे ला साजरा होण्याऐवजी मे च्या पहिल्या रविवारी साजरा होत आहे या गोष्टीची समीक्षा करत, ही कॉंग्रेस ठराव करत आहे की:

> "ॲमस्टरडॅम मधील आंतरराष्ट्रीय समाजवादी कॉंग्रेस सर्व देशांमधील सामाजिक–जनवादी पक्षांना आणि ट्रेड युनियन्सना आवाहन करत आहे की त्यांनी एक मे रोजी संपूर्ण शक्तीनिशी आंदोलन करावे जेणेकरून आठ दिवसांच्या कार्य दिवसाच्या मागणीला कायद्याने लागू करता यावे, सर्वहारांच्या वर्ग मागण्यांना प्राप्त करता यावे आणि आंतरराष्ट्रीय शांती स्थापित व्हावी. काम बंद करणे ही एक मे च्या आंदोलनाची सर्वात प्रभावशाली पद्धत आहे. त्यामुळे कॉंग्रेस सर्व देशांमधील सर्वहारा संघटनांना बाध्य करत आहे की जिथेही कामगारांना इजा न पोहोचवता शक्य आहे तिथे एक मे रोजी काम बंद करावे".

जेव्हा एप्रिल 1912 मध्ये सायबेरियामधील लेना येथे सोन्याच्या खाणीमधील कामगारांचे हत्याकांड झाले, तेव्हा रशियामध्ये पुन्हा एकदा क्रांतिकारक सर्वहारा जनकारवायांचा प्रश्न ऐरणीवर आला. त्या वर्षी मे दिनी शेकडो हजार कामगार काम बंद करून रस्त्यांवर उतरले. 1905 च्या अयशस्वी रशियन क्रांतीनंतर निरंकुश शासन करणाऱ्या झारच्या अत्याचारांना हे आव्हान होते. याच मे दिवसाबद्दल लेनिन लिहितात:

> "संपूर्ण रशियात झालेला मे मधील महान संप, त्याच्याशी जोडून रस्त्यावर झालेली निदर्शने, कामगारांच्या क्रांतिकारक घोषणा, कामगारांमध्ये दिली गेलेली क्रांतिकारक भाषणे स्पष्टपणे दाखवतात

की रशिया पुन्हा एकदा क्रांतिकारी परिस्थितीच्या आरोहात प्रवेश करत आहे."

## पहिल्या महायुद्धा दरम्यान मे दिवस

सामाजिक–जनवादी नेत्यांकडून युद्धादरम्यान केलेला विश्वासघात 1915 साली पूर्ण नग्नतेचे समोर आला. त्यांनी ऑगस्ट 1914 मध्ये साम्राज्यवादी सरकारांसोबत केलेल्या वर्गीय हातमिळवणीचा हा तार्किक परिणाम होता. जर्मनीमधील सामाजिक जनवाद्यांनी कामगारांना काम करत राहण्यास सांगितले आणि फ्रांसच्या समाजवाद्यांनी एका विशेष घोषणापत्रातून अधिकाऱ्यांना एक मे रोजी न घाबरण्यासाठी आश्वस्त केले. इतर युद्धरत देशांमध्ये सुद्धा समाजवाद्यांच्या बहुतांश गटांमध्ये सुद्धा असाच कल दिसून येत होता. अशा परिस्थितीमध्ये फक्त रशियामध्ये बोल्शेविक आणि इतर देशांमध्ये अल्पमतातील क्रांतिकारकच समाजवाद आणि आंतरराष्ट्रीयतावादाशी प्रामाणिक राहिले. लेनिन, रोझा लक्झेंबर्ग आणि कार्ल लिबनेख्त यांचे आवाज सामाजिक अंधराष्ट्रवादाच्या नशेत असलेल्या या वेडपट लोकांच्या विरोधात उभे राहिले. 1916 मध्ये मे दिनी आंशिक रुपात झालेले संप आणि रस्त्यांवरील खुल्या झडपा यांनी हे दाखवून दिले की सर्व युद्धरत देशांमध्ये कामगार स्वत:ला धोकेबाज पुढाऱ्यांच्या विखारी प्रभावापासून मुक्त करत होते. सर्व क्रांतिकारकांप्रमाणे लेनिनच्या नजरेत "संधीसाधूपणाचे पतन (दुसऱ्या इंटरनॅशनलचे पतन) कामगार आंदोलनासाठी फायदेशीर होते" आणि धोकेबाजांपासून मुक्त एक नवीन इंटरनॅशनल बनवण्याचे लेनिनचे आवाहन ही काळाची गरज होती.

लेनिनच्या 'साम्राज्यवादी युद्धाला गृहयुद्धात बदलवण्याच्या' नाऱ्यानुसार सर्व जगातील क्रांतिकारक आंतरराष्ट्रीयतावादी पक्ष आणि छोट्या छोट्या समाजवादी पक्षांची एकता मजबूत करण्यात 1915च्या झिमरवाल्ड आणि 1916च्या किंथॉल समाजवादी कॉंग्रेसने मदतच केली. 1916 मध्ये मे दिनी कार्ल लिबनेख्त आणि समाजवादी आंदोलनातील त्यांच्या समर्थकांच्या नेतृत्वाखाली बर्लिनमध्ये झालेली भव्य निदर्शनं ही कामगार वर्गाच्या जिवंत शक्तींचा पुरावाच होती, जी पोलिसांचे दमन आणि (संघटनेच्या) आधिकारिक नेतृत्वाच्या विरोधानंतरही सतत पुढे जात होती.

1917 मध्ये अमेरिकेत युद्धाची घोषणा होऊनही मे दिवसाच्या कारवाया थांबल्या नाहीत. समाजवादी पक्षाच्या सर्वहारा तत्वांनी सेंट लुईमध्ये एप्रिलमध्ये सुरू झालेल्या आपात अधिवेशनात युद्ध विरोधी प्रस्तावाला गांभीर्याने घेतले आणि मे दिवसाचा वापर साम्राज्यवादी युद्धाच्या विरोधात आंदोलनासाठी केला. 1919 मध्ये क्लिवलॅंड मध्ये झालेले मे दिवसाचे निदर्शन खास करून जास्त उग्र होते. याचे नेतृत्व करणारे चार्ल्स ई. रथेनबर्ग हे समाजवादी पक्षाचे स्थानिक सेक्रेटरी होते. पुढे

जाऊन ते कम्युनिस्ट पक्षाच्या संस्थापकांपैकी आणि नेत्यांपैकी एक बनले आणि त्याचे जनरल सेक्रेटरी सुद्धा राहिले. 20,000 पेक्षाही जास्त कामगारांनी या निदर्शनांमध्ये पब्लिक स्वेअरच्या रस्त्यांवर मोर्चा काढला आणि तिथे हजारो नवीन लोकांनी सामील होऊन या आंदोलनाला भव्य बनवले. पोलिसांनी निर्घृणपणे या कामगारांच्या सभेवर हल्ला केला ज्यामध्ये एका कामगाराचा मृत्यू झाला आणि एक कामगार गंभीररित्या घायाळ झाला.

1917 चा मे दिवस, जुलै आणि नंतर ऑक्टोबर क्रांतीचा दिवस हे रशियन क्रांतीला तिच्या लक्ष्यापर्यंत नेणाऱ्या विकासाचे विविध टप्पे होते. रशियन क्रांतीने, जिने मानवी इतिहासात एका नवीन युगाची सुरूवात केली, तिने मे दिवसाच्या परंपरेला नवीन संवेग आणि महत्व प्राप्त करून दिले. धरतीच्या सहाव्या हिश्श्यावर सर्वहारा शक्तीच्या विजयाने त्या आकांक्षेला जीवनात उतरवले, ज्या आकांक्षेची कल्पना 1 मे 1890 रोजी युनियन स्क्वेअर, न्यूयॉर्क येथे पहिल्या मे दिवसाच्या निदर्शनांमध्ये अ.फे.ले.च्या नेत्यांनी केली होती. त्यादिवशी संप करणाऱ्या कामगारांनी ठराव केला होता “आठ तासांच्या कार्यदिवसासाठी संघर्ष करत असताना आम्ही आमच्या अंतिम ध्येयावरची नजर हटवणार नाही—(भांडवली) मजूरी व्यवस्थेचा नाश”. रशियन कामगारांनी हे ध्येय सर्वप्रथम प्राप्त केले, पण 1917 नंतर ‘अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर’चे नेते त्या लक्ष्यापासून बरेच दूर गेलेले होते ज्याची त्यांनी 1890 मध्ये घोषणा केलेली होती. आता भांडवली व्यवस्थेला कायम ठेवण्यात आणि साम्राज्यवादासाठी रस्ता सुकर करण्यात त्यांना जास्त रस होता. त्यांना वाटत नव्हते की अमेरिकन कामगारांना रशियन सर्वहाराच्या त्या ऐतिहासिक यशापासून प्रेरणा मिळावी, ज्याने मे दिवसाच्या संघर्ष भावनेला एक नवीन अर्थ दिला होता; तो मे दिवस ज्यादिवशी कामगार वर्गाने आपल्या आंतरराष्ट्रीय एकजुटतेचे प्रदर्शन करत भांडवली शोषण व मजूरी गुलामीच्या व्यवस्थेपासून मुक्तीच्या लक्ष्याची घोषणा केली होती.

1923 साली मे दिवसासाठी ‘वर्कर’ नावाच्या साप्ताहिकात चार्ल्स ई. रथेनबर्ग यांनी म्हटले होते: “मे दिवस—तो दिवस जो भांडवलदारांच्या मनात भिती आणि कामगारांच्या मनात आशा निर्माण करतो. यावर्षी सर्व जगातील कामगार अमेरिकन कम्युनिस्ट आंदोलन, इतिहासात कधीही नव्हते असे जास्त मजबूत स्थितीत बघतील.... भव्य यशासाठी रस्ता मोकळा आहे, आणि दुनियेतील कोणत्याही जागेप्रमाणे अमेरिकेचेही भविष्य कम्युनिझमच आहे.”

याच साप्ताहिक ‘वर्कर’च्या जवळपास सतरा वर्षे अगोदरच्या, 27 एप्रिल 1907 रोजी प्रकाशित, एका अंकात जो मे दिवसाचा विशेषांक होता, युजीन व्ही. डेब्स यांनी लिहिले होते की, “हा सर्वात पहिला आणि एकमात्र आंतरराष्ट्रीय दिवस आहे. हा कामगार वर्गाशी संबंधित आहे आणि क्रांतीला समर्पित आहे.”

मे दिवसाच्या या वाढत्या झुंझार परंपरेच्या विरोधात 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर'च्या नेत्यांनी फक्त तथाकथित श्रम दिवसाच्या प्रथेलाच प्रोत्साहित केले आहे, जो सप्टेंबरच्या पहिल्या सोमवारी साजरा केला जातो. मुळातच 1885 साली स्थानिक स्तरावर या दिवसाला स्विकार केले गेले आणि नंतर मे दिवसाच्या आयोजनांना प्रभावहिन बनवण्यासाठी अनेक राज्य सरकारांनी याला मान्यता दिली. हुवर प्रशासनाच्या केंद्रीय सरकारने 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर'च्या सहकार्याने एक मे रोजी 'बाल स्वास्थ दिवस' घोषित करून एक अजून एक मे दिवस विरोधी कारवाई केली. मुलांच्या आरोग्यासंदर्भात अचानक निर्माण झालेल्या या रूचीला 1928च्या 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर'च्या संमेलनासाठी कार्यकारणी परिषदेने तयार केलेल्या अहवालाला वाचून समजून घेऊ शकतो. यामध्ये लिहिले आहे की,

> — "कम्युनिस्ट अजूनही 1 मे ला कामगार दिवस म्हणून साजरा करतात. पण आजच्या नंतर एक मे हा 'बाल स्वास्थ दिवस' म्हणून साजरा केला जाईल. कारण कॉंग्रेस द्वारे पास केलेल्या प्रस्तावानुसार अध्यक्षांनी लोकांना आवाहन करणे अपेक्षित आहे की त्यांनी आता एक मे ला 'बाल स्वास्थ्य दिवस' म्हणून साजरा करावा. याचे लक्ष्य हे आहे की या पूर्ण वर्षात लोकांच्या मनात लहान मुलांच्या आरोग्याच्या रक्षणाप्रती जागरूकता निर्माण करावी. हे एक सर्वात योग्य लक्ष्य आहे. *यासोबतच आता मे दिवस आता ना संपाच्या दिवसाच्या रुपात ओळखला जाईल आणि ना कम्युनिस्ट कामगार दिवसाच्या रूपात."* (जोर लेखकाचा)

## 1929 चे संकट

अनुभवांपासून न शिकता, जागतिक युद्धाच्या जवळपास एक दशकानंतर प्रतिक्रियावादी ट्रेड युनियन नेते भांडवलशाही मध्ये कायमस्वरूपी संपन्नता आल्याच्या भ्रमाचे बी रोवत होते. त्यांना यात काहीच रस नव्हता की हजारो लाखो असंघटीत कामगारांना एका झेंड्याखाली संघटीत करावे आणि त्या संकटाला तोंड देण्याची तयारी करावी जे भांडवलशाही लवकरच घेऊन येणार आहे. जेव्हा 1929 च्या शेवटी आर्थिक संकट आले, आणि ट्रस्ट आणि एकाधिकारी संघांनी या संकटाचा सगळा बोजा कामगारांवरच टाकू पाहिला तेव्हा कामगारांसमोर एकच रस्ता शिल्लक होता—संप आणि बेरोजगार कामगारांच्या जन–संघर्षांचा रस्ता. या संघर्षांच्या परिणामी, ज्यांचे नेतृत्व कम्युनिस्टांनी केले होते, अमेरिकन कामगार अधिक भयंकर संकटांना थांबवण्यात आणि आपल्या लोकशाही अधिकारांची व्याप्ती वाढवण्यात यशस्वी झाले. सोबतच त्यांनी 1930च्या दशकात 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर' आणि सी.आय.ओ. या दोन्हींमध्ये अमेरिकन कामगार

वर्गाच्या इतिहासातील सर्वात मोठ्या प्रगतीची नोंद केली. सी.आय.ओ.चा 1935 मध्ये जन्म आणि विविध उद्योगांमधील कामगारांमध्ये वेगाने विस्तार हे संपूर्ण कामगार आंदोलन आणि देशासाठी ऐतिहासिक महत्वाचे यश होते. अमेरिकन कामगारांच्या या उभारामुळे निग्रो लोकांच्या समतेच्या हक्कांसाठी संघर्ष आणि त्यातून अमेरिकेत एक लोकशाही मोर्चा अजून मजबूत होण्याची स्थिती तयार झाली.

साम्राज्यवादी युद्ध आणि क्रांती तसेच एका अभूतपूर्व आर्थिक संकटाने हादरून टाकल्यानंतर फक्त दिड दशकांच्या छोट्याशा काळातच जगातील भांडवलशाहीने स्पष्टपणे एका स्थायी संकटाच्या काळात प्रवेश केला. साम्राज्यवादी प्रतिस्पर्धा जिने पहिल्या महायुद्धाला जन्म दिला होता, या संकटामुळे अजूनच तीव्र होत गेली. जगाच्या सहाव्या हिश्श्यावर भांडवलशाही नष्ट झाल्यामुळे, वसाहतींमध्ये स्वातंत्र्यासाठी चाललेल्या संघर्षांचा प्रचंड विकास झाल्यामुळे, उन्नत भांडवली देशांमध्ये आपला जीवनस्तर उंचावण्यासाठी आणि आपल्या लोकशाही अधिकारांना कायम ठेवण्यासाठी सतत मजबूत होत असलेल्या कामगारांच्या इराद्यांमुळे भांडवलशाहीचे हे स्थायी संकट वाढतच गेले. ट्रस्ट आणि मक्तेदारी भांडवलदार आर्थिक आणि राजकीय जीवनावर आपली पकड वाचवण्यासाठी, आणि इतिहासाच्या अपरिहार्य विकासाला रोखण्यासाठी, फॅसिस्ट दहशतवादी हुकूमशाहीला शरण गेले. फ्रांस, इंग्लंड, आणि अमेरिकेतील मक्तेदार भांडवलदारांनी फॅसिस्ट आंदोलनाला प्रोत्साहन देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यांनी पराजित जर्मनीसहीत सर्व देशांमध्ये, जिथे कामगार वर्ग आणि पुरोगामी शक्तींची कमजोरी आणि विखुरलेपणामुळे फॅसिस्ट विजयाचे दरवाजे उघडले होते, फासीवादाला प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या थैल्या मोकळ्या केल्या. मक्तेदारी भांडवलाच्या या विश्वव्यापी प्रयत्नांनी शतकांच्या संघर्षांनंतर मिळालेल्या लोकशाही हक्कांनाच नष्ट करण्याचा प्रयत्न केला नाही तर एका नवीन जागतिक युद्धाचाही रस्ता मोकळा केला.

## फासिवादाविरुद्ध संघर्ष

1933 ते 1939 दरम्यान जर्मन फासिवादाने पूर्ण जगातील प्रतिक्रियावादाच्या नेतृत्वाची भुमिका निभावली. अँग्लो–अमेरिकन साम्राज्यवादाकडून प्रोत्साहन घेऊन आणि सर्व जगावर कब्जा करण्याच्या आपल्या साम्राज्यवादी मनसूब्यासह जर्मन फासीवादाने योजनाबद्ध पद्धतीने दुसऱ्या महायुद्धाची तयारी चालू केली. हा तोच अँग्लो–अमेरिकन साम्राज्यवाद होता ज्याचे सुरूवातीपासून एकच लक्ष्य होते—समाजवादाच्या विनाशासाठी युद्ध, ज्यासाठी तो आता नाझी जर्मनीला उभे राहण्यात मदत करत होता. दुसरीकडे जपानी साम्राज्यवाद सुद्धा आपल्या स्वार्थांसाठी या कुकृत्यामध्ये सामील होत गेला. आपल्या प्रकृतीनुसार

अशाप्रकारचे कोणतेही युद्ध राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यांच्या विरोधात उभे असते. अशा परिस्थितीत सतत ही गोष्ट स्पष्ट होत गेली की मानवजातीचा विकास आता कामगार, शेतकरी आणि वसाहतींमधील दमीत, चिरडलेल्या जनतेच्या हातातच आहे. फक्त याच शक्ती पाऊल पुढे टाकून, पुढाकार घेऊन आणि आपल्या एकतेच्या आणि विरोधाच्या जोरावर सर्व देशांमधीला लोकशाही शक्तींना आणि तत्वांना आपल्या भोवती गोलबंद करू शकतात आणि मक्तेदार भांडवलशाही द्वारे प्रेरित प्रतिक्रियावादाच्या वाढत्या अनर्थकारी विकासाला थांबवू शकतात. यामुळेच, तीसच्या संपूर्ण दशका दरम्यान, फॅसिस्ट हल्याला विरोध करण्यासाठी आणि एका नवीन जागातिक विध्वंसाला थांबवण्यासाठी, सर्व लोकशाही शक्तींना आणि जनतेला एकतेचे आवाहन मे दिवस सतत करत राहिला.

दुसऱ्या महायुद्धाने हे स्पष्टपणे दाखवले आहे की कामगार वर्गच कोणत्याही राष्ट्राच्या पाठीचा कणा आहे. सत्तेवर कब्जा करण्यात आणि जगाला एका विनाशकारी युद्धात ढकलण्यात फासीवाद यामुळेच यशस्वी झाला की कामगार वर्ग असंघटीत होता. पण तो कुठेही एकजूट आणि युद्धरत कामगार वर्गावर विजय मिळवू शकला नाही, जो प्रत्येक ठिकाणी प्रगती आणि लोकशाहीच्या रक्षणाचे नेतृत्व करत होता जेणेकरून फासीवादी दानवाचे मुंडके चिरडले जावे. या युद्धात प्रत्येक ठिकाणच्या लोकशाहीवादी लोकांनी आपल्या डोळ्यांनी पाहिले की सोवियत रशिया आणि प्रत्येक ठिकाणचे कामगारच राष्ट्रीय स्वातंत्र्य, लोकशाही आणि प्रगतीसाठी फासीवादाविरोधात अग्रस्थानी होते.

या युद्धादरम्यान प्रत्येक ठिकाणी कामगारांनी कामावर हजर राहून आणि फासीवादी सैन्याच्या नाशासाठी हत्यार बनवून मे दिवस साजरा केला. जेव्हा 1945 मध्ये युद्ध संपले तेव्हा युद्धानंतर पहिल्या मे दिवसाच्या सोहळ्यात लाखो–लाखो कामगारांनी गर्दी केली, खासकर युरोपातील विजेत्या आणि स्वतंत्र झालेल्या देशांमध्ये. या कामगारांनी युद्ध चालू ठेवण्यासाठी आणि फासीवादाच्या सर्व अवशेषांना मूळापासून उखडून टाकण्यासाठी आपली बांधिलकी दाखवली, जेणेकरून कामगार वर्गाची जनतेच्या इतर पुरोगामी तत्वांशी कायमस्वरूपी एकता कायम व्हावी, जेणेकरून फासीवादाच्या छत्रछायेत जाण्यापासून मक्तेदारी भांडवलदार वर्गाला पूर्णत: अक्षम करण्यात यावे, जेणेकरून फासीवादाला पुन्हा आपले नरभक्षी शासन बनवता न यावे, जेणेकरून जनतेची सर्वात श्रेष्ठ शक्ती म्हणजे लोकशाही स्थापित आणि विकसित करता यावी, जेणेकरून एका कायम स्वरूपी शांतीची निर्मिती करता यावी आणि दमन–उत्पीडन–शोषणापासून मुक्त समाजवादी दुनियेच्या मार्गावर अग्रसर होता यावे.

*प्रत्येक देशातील कामगार वर्ग, मे दिवसाच्या निमित्ताने, मानवतेच्या आनंदी भविष्यासाठी आणि शांतीसाठी संघर्ष करत, आंतरराष्ट्रीय एकता आणि मैत्रीच्या भावनेसहित, सर्व जगातील जनतेला सलाम करत आहे.*

...

## मे दिवसाबद्दल लेनिन



*"...शक्य तितक्या मोठ्या संख्येने जागोजागी मे दिवस साजरा केला गेला पाहिजे. आपण यामध्ये मोठ्या संख्येने भाग घेतलाच पाहिजे; पण फक्त मोठ्या संख्येने कामगारांनी भाग घेणे पुरेसे नाही, तर पूर्णतः संघटीत होऊन, आपली वर्ग जाणीव प्रदर्शित करत, रशियातील जनतेच्या राजकीय मुक्तीसाठी अदम्य संघर्षाची सुरुवात दर्शवणाऱ्या निर्धारासहित, सर्वहारांच्या वर्गविकासाच्या मुक्त संधीसाठी आणि समाजवादासाठीच्या खुल्या संघर्षासाठी सहभागी झाले पाहिजे."*

'कामाचे तास आठ करा' या मागणीला घेऊन अमेरिकेतील शिकागोसहीत जगभरातील कामगारांनी एकोणीसाव्या शतकात सुरू केलेल्या झुंझार राजकीय आंदोलनाचे प्रतिक म्हणजे मे दिवस. कामगार दिवसाचा इतिहास हा भांडवलशाही व्यवस्थेला गाडून समाजवादी व्यवस्थेची स्थापना, कामगार वर्गाचे अधिनायकत्व आणि कामगार वर्गाच्या राजकीय मागण्यांशी अतूटपणे जोडलेला आहे.

अमेरिकन कम्युनिस्ट कार्यकर्ते अलेक्झांडर ट्रॅक्टनबर्ग यांनी लिहिलेला हा लेख आजही कामगार दिवसाचा इतिहास जाणून घेण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. कामगार दिवसाच्या निर्मितीचा इतिहास, कामगार दिवसाचे राजकीय महत्व कमी करण्याचे आणि टिकवण्याचे विविध राजकीय गटांचे प्रयत्न, दुरुस्तीवादी आणि सोशलिस्ट पक्षांचा कामगार दिनासोबत विश्वासघात, सोवियत क्रांतिमध्ये कामगार दिवसाची भुमिका, विसाव्या शतकाच्या सुरूवातीला होत असलेले जागतिक स्तरावरील राजकीय बदल यावर हा लेख भाष्य तर करतोच; सोबतच आजच्या कामगारवर्गीय राजकारणाच्या दृष्टीने कामगार दिवसाचे महत्व समजून घेण्यासाठीही अतिशय उपयुक्त असा हा लेख आहे.

सहयोग मूल्य
रू. 15/-